


धाडसी मॉली आणि मी

जेन ओ'कॉनर

मराठी: अश्विनी बर्वे

धाडसी मॉली आणि मी

जेन ओ'कॉनर

मराठी: अश्विनी बर्वे



मॉली खूप धाडसी आहे. दुसरीत असणाऱ्या कोणाही मुलाच्या तुलनेत तिच्यात जास्त हिमंत आहे. मॉली बागेतील चौकोटीवर एका पायावर उभी राहू शकते.





जेव्हा निकी तिच्या टेबलात मेलेले पाण्यातले किडे लपवते आहे, तर ती त्याला सुद्धा कशाला घाबरत नाही.




आणि जेव्हा मोठी मुले तिला चिडवतात, तेव्हा मॉली त्यांना रागावून तिथून निघून जायला सांगते.



मॉली खरोखच खूप धाडसी आहे. जर मी तिच्यासारखी असते तर ...


आज जेवणाच्या सुट्टीत मॉली म्हणाली.

"बेथ, तू या आठवड्याच्या शेवटी आमच्या गावातल्या घरी माझ्याबरोबर येशील का? तिथे तुला खूप मजा येईल."



वाह!

मला वाटतं मॉलीला मी खरोखरच आवडते असा विचार करून मला खूप छान वाटलं.



पण याआधी मी कधीही माझं घर सोडून दूर गेले नव्हते. जर तिथं मला घराची आठवण आली तर? जर तिथलं खाणं मला आवडलं नाही तर ?



जर तिथे खूप सारे जंगली प्राणी असतील तर? मी नक्की सांगू शकत नाही की मला तिथे जायचं आहे कि नाही ते?





मी मौलीबरोबर एका टेबलवर बसली होते. मी तिला म्हणाले, “वाह! मौली तू बोलावलं हे छानच आहे पण मला माहित नाही की माझे आईवडील काय म्हणतील ते?”

त्यारात्री मौलीच्या आईने माझ्या आईला फोन केला. माझी आई हो म्हणाली. मग मी नाही कसं म्हणू शकत होते? सगळं काही ठरलं. आता मौलीचे आईवडील शनिवारी सकाळी मला घ्यायला येतील.



शुक्रवारी रात्री मी माझे सामान पिशवीत भरले.नंतर आईने मला झोपवले. “मला भीती वाटते मला तुझी आठवण येईल.” मी म्हटले.


“मला विश्वास आहे की मी सारखी रडत बसेन. तेव्हा मौली विचार करेन की मी भित्री मुलगी आहे. मग तिला मी आवडणार नाही.”

माझ्या आईने मला जवळ घेतलं. “तिथं तुला खूप मजा येईल. आणि जर काही झालं तर मौलीला समजेल की तुला घरची आठवण येत आहे.” मग माझ्या आईने माझी पापी घेतली “एक पापी आजच्या रात्रीसाठी, दुसरी पापी उद्याच्या रात्रीसाठी जेव्हा तू मौलीच्या घरी असशील.”





मौलीचे आईवडील दुसऱ्या दिवशी
सकाळी लवकर आले. मी घाबरलेली
होती. पण मी उत्साहात होते.



सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे की मी
मौलीच्या समोर आपली भीती
दाखवायची नव्हती. म्हणून मी
माझ्या आईबाबांना अच्छा केले
आणि मग मागच्या सिट मी जाऊन
बसले.




मौलीचा कुत्रा आमच्यामध्ये बसला.
“हा बुच आहे,” मौली म्हणाली.

त्वरित बुचने मला चाटायला सुरुवात केली.
मला मोठ्या कुत्र्यांची खूप भीती वाटते.

पण मग मी माझी भीती सांगितली का?
बिलकुल नाही!

मी असा अभिनय केला की जसे कुत्र्याने
चाटणे खूप आवडते आहे.


दुपारपर्यंत आम्ही मॉलीच्या गावात पोहोचलो. तिचे घर एका टेकडीवर एकटे होते. "येथे एक शेत होते,“ मॉलीच्या आईने मला सांगितले. “हे घर १५० वर्षे जुने आहे.“ मला नवीन घरे आवडतात. मला भुते आवडत नाहीत. पण मी मॉलीच्या आईला ते सांगितले नाही.





जेवणानंतर लगेच, आम्ही बेरी वेचायला गेलो. बेरी वेचायला मजा येत होती, पण नंतर मला झुडपांवर बरेच कीटक दिसले.

मला त्यांना हात लावायचा नव्हता. पण मॉलीने त्यांना हाकलून लावले. मग मी ही काही प्रयत्न केले. "अरे! हे खूप मजेदार आहे," मी म्हणाले. "मी यापूर्वी कधीही अशा बेरी निवडल्या नाहीत."



आम्ही खूप बेरी खाल्ल्या. त्यांचा लाल रस माझ्या चेहऱ्यावर आणि हातांवर पसरला.

मी रक्ताचे नाटक केले.मी म्हणाले की मी पिशाच्च आहे.



मी मॉलीच्या मागे फिरले. "तुला काय माहित आहे?" मी तिला म्हणाले.

"तुझ्या बरोबर गावात आले याचा मला खूप आनंद झाला."



नंतर, आम्ही रानफुलांचा शोध घेतला. मला ते एक आनंददायी आणि सुरक्षित काम वाटले. प्रथम, आम्ही एका ओढ्यावर गेलो. ओढा ओलांडण्यासाठी एक लाकूड होते.



मॉली सरळ लाकडाच्या पलीकडे धावली.

यार, मॉलीमध्ये खूप धाडस आहे!

बुचही पळून गेला.

मी लाकडाकडे पाहत राहिले.

"या बाजूला रानफुले नाहीत का?" मी विचारले.

मॉलीने मान हलवली, "सर्वात चांगली फुले थोडी पुढे आहेत. चल, बेथ. घाबरू नकोस. फक्त लाकूड ओलांड. ते पुरेसे सोपे आहे."





“ठीक आहे," मी स्वतःला म्हणाले.

"मला इतका भित्रेपणा करायला नकोय.“

मग मी लहान पावले टाकत लाकडावर चालायला सुरुवात केली. शेवटी, मी घसरले.

अरेरे! मी खाली पडले.

"तू ठीक आहेस ना?" मॉलीने विचारले.

मी मान हलवली. पण माझी पाठ खूप दुखत होती.







आम्ही थोडा वेळ फुले वेचली. आणि परतीच्या प्रवासाला निघालो तेव्हा, यावेळी मी एका लाकडावर रेंगाळले.

पण मॉलीने मला छळले नाही. मला माहित होते की मी मूर्ख दिसत आहे.

घरी परतताना, बुचला एक ससा दिसला. तो मक्याच्या शेतात त्याचा पाठलाग करत गेला. "मूर्ख कुत्रा!" मॉली म्हणाली.

"तो त्या सशाला कधीच पकडू शकणार नाही. आपण बुचला शोधायला जायला हवे."



"अरे देवा!" मी विचार केला. पण मी मॉलीच्या मागे आत गेले.

आम्ही बुचच्या भुंकण्याच्या आवाजाच्या मागे गेलो. अरे देवा, ते शेत खूप मोठे होते! आमच्यावर मक्याचे पीक उगवत आहे असे वाटत होते. शेत मैलभर पसरलेले होते.



शेवटी, आम्हाला बुच दिसला.

मॉली धावत गेली आणि तिने त्याला मिठी मारली. मग तिने माझा हात धरला आणि मला ओढले.

"ही जागा भयानक आहे,“ मॉली म्हणाली.

"चला आपण येथून लवकर निघूया."



पण मला तिथे भीती वाटली नाही! बाहेर पडणे सोपे नव्हते. सर्वत्र मक्याची रोपे सारखीच दिसत होती. खूप उष्णता होती आणि काही दिसणे कठीण होते. आमच्या चेहऱ्यावर कीटक उडत होते. असे वाटत होते की आम्ही सतत गोलगोल फिरत आहोत.

बुच आपल्याला मार्ग शोधण्यास मदत करू शकत नाही का?" मी विचारले.

मॉलीने "नाही" असे मान हलवली.

"बुचला त्याचे कुत्र्याचे घरही सापडत नाही."

मग मॉली डोळे चोळू लागली. आणि तिचे नाक वाहू लागले.

"बेथ," ती म्हणाली,

"आपण खरोखर इथे अडकलो आहोत. मला खूप भीती वाटते."

धाडसी मॉली घाबरली? माझा विश्वासच बसत नव्हता!

मग मी तिचा हात धरला. "काळजी करू नकोस," मी तिला सांगितले. मलाही जरी भीती वाटत होती."

आपण इथून नक्की बाहेर जाऊ."





मग मला एक कल्पना सुचली. "चल जाऊया," मी मॉलीला म्हणाले.

मग मी मक्याच्या दोन ओळींमधील बांधावरून चालायला सुरुवात केली. मी अजिबात वळले नाही, सरळ चालत निघाले.



आम्ही सरळ रेषेत चालत राहिलो.

"तो एक लांब रस्ता असे समजूया,“ मी म्हणाले.

“कधी ना कधी आपण त्याच्या शेवटापर्यंत पोहोचू."

आणि शेवटी आम्ही पोहोचलो!मी आणि मॉलीने एकमेकांना मिठी मारली.

मग आम्ही वर-खाली उड्या मारू लागलो.

भू! भू! बुच ओरडला.

“व्वा," मॉली म्हणाली, "तू आम्हाला बाहेर काढलेस."







जेव्हा आम्ही मॉलीच्या घरी परतलो तेव्हा तिची आई म्हणाली, "मुलींनो, तुम्ही कुठे होता? रात्रीच्या जेवणाची वेळ झाली आहे. "मॉलीने तिच्या पालकांना संपूर्ण कहाणी सांगितली, बुचचा पाठलाग करताना आम्ही मक्याच्या शेतात कसे हरवून गेलो याबद्दल.मग मॉलीने मला मिठी मारली.

"मी घाबरले होते,“ मॉलीने त्यांना सांगितले.

"पण बेथ अजिबात घाबरली नाही!तिच्यात किती धाडस आहे!“

“धाडसी? मी? माझा माझ्या कानांवर विश्वासच बसत नव्हता!

रात्रीचे जेवण खूप छान होते. आम्ही शेकोटीवर मक्याची कणसे भाजली.





खाण्यासाठी भरपूर मक्याची कणसे होती.

"अरे नाही! आज आम्ही खूप मक्याची कणसे बघितली! "मी आणि मॉली एकत्र ओरडलो. पण तरीही आम्ही प्रत्येकी तीन मक्याची कणसे खाल्ली.



झोपायच्या आधी, मला नक्कीच घरची थोडी आठवण येत होती. मॉलीच्या आईने मला खूप जवळ घेतले. त्यामुळे मला खूप बरे वाटले.

मग मॉलीने मला सांगितलेकी मी तिची सर्वात चांगली मैत्रीण आहे. आम्ही आमच्या लहान बोटे एकमेकांत गुंतवली. त्यानेही मला झोपायला मदत झाली.





कदाचित मॉली बरोबर असेल. कदाचित
मी खरोखरच एक धाडसी, मुलगी आहे!

मॉली खूप धाडसी होती,

पण बेथला खूप भीती वाटत असे.

बेथ तिच्या मैत्रिणीइतकी

मॉलीइतकी धाडसी का असू शकत नव्हती?

दुसरी इयत्तेत शिकणाऱ्या

दोन मुलींबद्दलच्या

या मजेदार कथेत,

बेथला कळते की

तिच्यातही शेवटी धाडस होते!